जळगांव जिल्हा मराठा विद्याप्रसारक सहकार समाज मर्या. संचलित

# श्री.एस.एस.पाटील कला, श्री.भाऊसाहेब टी.टी.साळुंखे वाणिज्य आणि श्री.जी.आर.पंडीत विज्ञान महाविद्यालय, जळगांव

## नुतन मराठा महाविद्यालय, जळगांव

# राष्ट्रीय छात्र सेना

## अहवाल २०२१-२२

सीटीओ-हेमाक्षी संजयराव वानखेडे
SW-एन.सी.सी. विभाग प्रमुख

## ❖ राष्ट्रीय छात्र सेना

२६ सप्टेंबर २०२१ रोजी महाविद्यालयात एनसीसी प्रथम वर्ष निवड शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी १८ महाराष्ट्र बटालियनचे एनसीसी जळगांवचे सुभेदार मेजर कोमलसिंग व पीआय स्टॉफ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.पी.देशमुख उपस्थित होते.

या निवड शिबिरानिमित्त १८ महाराष्ट्र एनसीसी बटालियन जळगावचे सुभेदार मेजर कोमलसिंग यांनी मार्गदर्शन व भारतीय सेनेची माहिती दिली. यानंतर प्रथम वर्षाकरीता कॅडेटसची निवड चाचणी आयोजित करण्यात आली. या निवड चाचणीत महाविद्यालयातील १५० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. विद्यार्थीनींची उंची, वजन व लेखी परीक्षेतून ३२ विद्यार्थीनिंची एनसीसी प्रथम वर्षाकरीता निवड करण्यात आली.



**राष्ट्रीय छात्रसेना शिबिर २०२१-२२ चे आयोजन प्रसंगी पीआय स्टाफ चाचणी घेतांना**

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये महाविद्यालयातील एनसीसी युनिट मध्ये प्रथम वर्ष-३२, द्वितीय वर्ष-१३ व तृतिय वर्ष-१० असे एकूण ५५ कॅडेटस यांना प्रशिक्षित करण्यात आले. या प्रशिक्षण कालावधीत राज्य व राष्ट्रीय अशा विविध पातळ्यांवरील विविध कॅम्प तसेच विविध सामाजिक उपक्रमामध्ये कॅडेटस सहभागी होते.

## ❖ सामाजिक उपक्रम

| अ.क्र. | कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| १ | जागतिक पर्यावरण दिवस (वृक्षारोपण) | ५ जुन २०२१ |
| २ | आंतरराष्ट्रीय योगा दिवस | २१ जुन २०२१ |
| ३ | कारगिल विजय दिवस | २६ जुलै २०२१ |
| ४ | महाविद्यालय कॅम्पस स्वच्छता | १४ ऑगस्ट २०२१ |
| ५ | स्वातंत्र्यदिन (१८ महाराष्ट्र बटालियनला गार्ड ऑफ ऑनर देतांना एनसीसी कॅडेटस SW) | १५ ऑगस्ट २०२१ |
| ६ | संविधान दिन | २६ नोव्हेंबर २०२१ |
| ७ | राष्ट्रीय छात्र सेना दिन | २७ नोव्हेंबर २०२१ |
| ८ | मतदार दिन | २५ जानेवारी २०२१ |
| ९ | प्रजासत्ताक दिन | २६ जानेवारी २०२२ |

❖ कॅम्प २०२१-२२

| Sr. No. | Camp | Location | Cadets Participant |
|---|---|---|---|
| 1 | Combined Annual Training Camp | Jalgaon | 40 |
| 2 | Ek Bharat Shreshtha Bharat | Bhubaneswar | 02 |
| 3 | Basic Leadership Camp | Amravati | 01 |
| 4 | Combined Annual Training Camp + TSC-1 | Amravati | 04 |
| 5 | Combined Annual Training Camp. (4th Oct. to 10th Oct. 2021) CATC-112 (RDC) | Amravati | 01 |
| 6 | Combined Annual Training Camp RDC- (18th Oct. to 24th Oct. 2021) | Amravati | 01 |
| 7 | IGS-Pre RDC (25th Oct. to 3rd Nov. 2021) | Pune | 01 |
| 8 | Dte Pre RDC-I (8th Nov. to 17th Nov. 2021) | Pune | 01 |
| 9 | Dte Pre RDC-II (19th Nov. to 28th Nov. 2021) | Pune | 01 |
| 10 | Dte Pre RDC-III (30th Nov. to 9th Dec. 2021) | Pune | 01 |
| 11 | Dte Pre RDC-IV (11th Dec. to 18th Dec. 2021) | Pune | 01 |
| 12 | RDCA + Delhi (18th Dec. to 29th Jan. 2022) | Delhi | 01 |

## ❖ योग प्रशिक्षण कार्यशाळा :

महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने दि.१५ ते २० जुन २०२१ या कालावधीत योगा प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच दि.२१ जुन २०२१ रोजी राष्ट्रीय छात्रसेना विभागाच्या वतीने एनसीसी कॅडेटस यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थीनी, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकरीता सामुहिक योगा प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण वर्गास CTO सौ.हेमाक्षी संजयराव वानखेडे, क्रीडा संचालक प्रा.वानखेडे सर, उपप्राचार्य एम.एस. पाटील यांनी मार्गदर्शन केले.



**आंतरराष्ट्रीय योगा दिवसाचे आयोजन प्रसंगी एनसीसी कॅडेट व प्रशिक्षक प्रशिक्षण देतांना**

## ❖ वृक्षारोपण :

दि.५ जुन २०२२ जागतिक पर्यावरण दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. एनसीसी विभागाच्या वतीने महाविद्यालय परिसरात कडूनिंब, पिंपळ, कदंब, आवळा, जांभूळ या वृक्षांची लागवड करुन वृक्षाची निगा राखण्याचा संकल्प करण्यात आला. याप्रसंगी मा.प्राचार्य डॉ.एल.पी. देशमुख, डॉ.एम.एस. पाटील, उपप्राचार्य-ए.बी.वाघ व CTO हेमाक्षी संजयराव वानखेडे उपस्थित होते.




जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण करतांना एनसीसी कॅडेट गीताश्री टेकवाडे, काजल बाविस्कर, हर्षल जाधव, तानिया सोनवणे व वैष्णवी खंगर

## ❖ कारगिल विजय दिन :

दि.२६ जुलै २०२१ रोजी प्राचार्य डॉ.एल.पी.देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयात एनसीसी विभागाच्या वतीने कारगिल विजय दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. CTO हेमाक्षी संजयराव वानखेडे यांनी भारतीय लष्कराची माहिती दिली तसेच कॅडेट दिशा पाटील हिने कारगिल दिना निमित्त माहिती सांगितली. मा.प्राचार्यांनी आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात विद्यार्थिनींना व विद्यार्थ्यांना सैन्याची वीरगाथा सांगुन गौरवशाली परंपरा विषद केली. सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन कॅडेट गितश्री टेकवाडे व Juo भाग्यश्री ठाकूर यांनी केले.



**कारगील विजय दिन साजरा करतांना एनसीसी कॅडेटस**

## ❖ महाविद्यालय कॅम्पस स्वच्छता अभियान :

स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला म्हणजेच दि.१४ ऑगस्ट २०२१ रोजी महाविद्यालय परिसर, वर्ग व इमारतीची स्वच्छता करण्यात आली. यात ५५ एनसीसी कॅडेट तसेच एनएसएस स्वयंसेवक सहभागी झाले होते.



**१४ ऑगस्ट २०२१ रोजी नूतन मराठा महाविद्यालयात स्वच्छता अभियान राबवितांना एनसीसी कॅडेटस व एनएसएस स्वयंसेवक**

## ❖ स्वातंत्र्य दिन :

दि.१५ ऑगस्ट २०२१ रोजी महाविद्यालयात स्वातंत्र्यदिनी डी.एड. कॉलेजच्या प्राचार्या सोनवणे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्राचार्य एल.पी.देशमुख, क्रीडा संचालक प्रा.वानखेडे, CTO हेमाक्षी संजयराव वानखेडे उपस्थित होते. तसेच काही SU कॅडेटस गार्ड ऑफ ऑनरसाठी १८ महाराष्ट्र

बटालियनला गार्ड ऑफ ऑनर दिले, त्यात SUO निकिता कसदेकर, JUO पूनम निकम, Cadet वनिता चव्हाण, Cadet हर्षा सपकाळे, JUO भाग्यश्री ठाकूर, JUO निकिता पाटील, Cadet सुवर्णा आगे, सार्जंट प्रेरणा गजानन पाटील, सुवर्णा नेरपगार यांनी तसेच सोनाली पाटील व वैष्णवी खंगर यांनी सहभाग नोंदविला.



**१५ ऑगस्ट २०२१ रोजी १८ महाराष्ट्र बटालियन येथे नूतन मराठा महाविद्यालयात एनसीसी कॅडेट गार्ड ऑफ ऑनर देतांना SW कॅटेडस्**

## ❖ संविधान दिन :

२६ नोव्हेंबर २०२१ रोजी संविधान दिन कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.पी.देशमुख, उपप्राचार्य डॉ.राजेंद्र देशमुख, उपप्राचार्य एन.जे.पाटील, उपप्राचार्य ए.बी.वाघ उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक CTO  हेमाक्षी वानखेडे यांनी केले. संविधानाची पार्श्वभूमी व संविधान दिन प्रत्येक भारतीयांनी साजरा करण्याची माहिती दिली.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतातील असलेली भौगोलिक, सामाजिक विविधता असुनही संविधानामुळे आपण गेल्या ७३ वर्षापासून एकसंघ आहोत. आपले स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी भारतीय संविधानाबद्दल सर्वांनी आपुलकी व निष्ठा ठेवणे समकालीन काळात आवश्यक असल्याचे सांगितले. याप्रसंगी उपस्थित मान्यवर, विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी संविधानाच्या प्रास्ताविकाचे सामुहिक वाचन केले.

लेप्टनंट शिवराज पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनात संविधान संसदेत पारित झाले तो दिवस खऱ्या अर्थाने स्वातंत्र्यदिन असून सर्वांना समान संधी, समान अधिकार देणारा संविधान हा धर्मग्रंथ नाही तर जीवन ग्रंथच आहे. प्रतिज्ञेतील भारत माझा देश आहे ही भावना तसेच संविधानाचे रक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे असे म्हणत तिचे पालन करण्याचा संकल्प या निमित्ताने सर्वांनी करावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. या कठीण काळात संविधान हा जगण्याचा श्वास आहे म्हणून त्यांचे रक्षण करणे आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. संविधानाचे महत्त्व सर्वांपर्यंत पोहोचवत सर्वांच्या हक्क आणि अधिकारासाठी त्याची जागृती हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे असेही त्यांनी सांगितले. प्राचार्य डॉ.एल.पी. देशमुख यांनी अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, संविधान हा खऱ्या अर्थाने आपल्या जगण्याचा श्वास आहे. आपण सर्वजण घटनेच्या समबद्ध चौकटीत बांधले गेलेलो आहोत. त्यामुळे सर्वांनी स्वातंत्र्य, बंधुत्व आणि न्यायाने जात, धर्म, लिंग, विषमता दूर करीत आपण भारतीय आहोत ही भूमिका अंगीकारण्याचा सर्वांनी प्रयत्न करावा. संविधानाचे पावित्र्य राखत आपल्या हक्कांबाबत जागरुक रहावे असे आवाहन केले.

याप्रसंगी आभार प्रदर्शन Cadet JUO निकिता पाटील हिने केले तर सुत्र संचालन Cadet आदिती वाणी हिने केले.

## ❖ राष्ट्रीय छात्र सेना दिन :

दि.२७ नोव्हेंबर २०२१ रोजी महाविद्यालयात एनसीसी दिनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी एनसीसीची स्थापना, उद्देश यांची माहिती देण्यात आली होती. माजी कॅडेट भाग्यश्री बाविस्कर हिने एनसीसी बाबत आपले अनुभव तसेच त्यांना एनसीसीमुळे कोणकोणते लाभ झाले याची माहिती दिली.

## ❖ मतदार दिन :

२५ जानेवारी २०२२ रोजी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त लोकशाहितील मतदानाचे महत्त्व या विषयावर सिनियर कॅडेट JUO कोमल पाटील यांनी केले. युवकांचा राजकीय सहभाग वाढविणे हा राष्ट्रीय मतदार दिनाचा महत्वाचा उद्देश असून वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या युवकांनी मतदार यादीत आपले नांव नोंदवावे असे आवाहन केले. मतदार कार्ड आता आधारकार्डशी लिंक होणार असल्याचे सांगुन यापुढे कोणी मतदान केले किंवा नाही याची नोंद होणार असल्याची माहिती लोकशाहीत मतदानाचे महत्व या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान SUO भाग्यश्री सोनवणे हिने भूषविले. भाग्यश्रीने भाषणात विवेक बुद्धी जागृत ठेवून मतदारांनी मतदान करायला हवे, सर्वांग सुंदर असलेल्या आपल्या लोकशाहीला बळकट करण्यासाठी कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करावयास पाहिजे असे आवाहन केले. याप्रसंगी एनसीसी कॅडेटसह इतर विद्यार्थी व प्राध्यापक सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कॅडेट प्रियंका ठाकूर तर सुत्रसंचालन सोनाली विकास पाटील हिने केले.

## ❖ प्रजासत्ताक दिन :

दि.२६ जानेवारी २०२२ रोजी महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन संस्थेचे अध्यक्ष तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.पी.देशमुख, डी.एड.कॉलेजच्या प्राचार्या सोनवणे मॅडम, नुतन हायस्कूलचे मुख्याध्यापक व लेफ्टनन्ट शिवराज पाटील, सिटीओ हेमाक्षी संजयराव वानखेडे उपस्थित होते.



**प्रजासत्ताक दिनानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.पी.देशमुख, लेफ्टनंट शिवराज पाटील, सीटीओ हेमाक्षी संजयराव वानखेडे आणि एनसीसी कॅडेटस**

## ❖ Combined Annual Training Camp at Jalgaon (SW 40)

या कॅम्प मध्ये विविध स्पर्धांचे आयोजन व आर्मी ट्रेनिंग देण्यात येते. मॅप रिडींग, फायरींग, हेल्थ अँड हायजीन, आपत्ती व्यवस्थापन यांचे धडे दिले गेले. यासह विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले त्यात गार्ड ऑफ ऑनर, बेस्ट डिसीजन, बेस्ट ड्रील, सामान्य ज्ञान, बेस्ट परफॉमन्स, डान्स इ. आयोजित करण्यात आले होते.



**जनरल नॉलेज कॉम्पिटीशन मध्ये एनसीसी कॅडेट SW/SD नूतन मराठा महाविद्यालय विजेतेपद घेतांना**

❖ एक भारत श्रेष्ठ भारत २ कॅडेट (दि.१९ ऑक्टो.२०२२)




`एक भारत श्रेष्ठ भारत` भुवनेश्वर येथील कॅम्पमध्ये एस.यु.ओ. नियती केशवलाल कसदेकर आणि जे.यु.ओ. प्रेरणा गजानन पाटील

❖ बेसिक लिडरशीप कॅम्प (०१ कॅडेट दि.१४ डिसेंबर २०२२)



अमरावती येथे आयोजित बेसिक लिडरशीप कॅम्प मध्ये प्रशस्तीपत्र स्विकारतांना एनसीसी कॅडेट अंकिता साळवे

## ❖ Republic Day Camp (RDC)



**दिल्ली येथे राजपथावर १८ महाराष्ट्र बटालियन महाराष्ट्राचे नेतृत्व करतांना एनसीसी कॅडेट SUO सोनाली विकास पाटील दि.२८ जानेवारी २०२२**

## ❖ RDC PM RALLY (२८ जानेवारी २०२२ पंतप्रधान रॅली)

सुवर्ण अक्षरात नोंद व्हावी अशी राष्ट्रीय स्तरावर कामगिरी करणारी नुतन मराठा महाविद्यालयाची विद्यार्थिनी SUO सोनाली विकास पाटील हिने प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्ली येथे राजपथावर झालेल्या पथसंचालनात ``गार्ड कमांडर`` म्हणून महाराष्ट्रातील मुलींचे नेतृत्त्व करुन ४५ वर्षानंतर जळगांव जिल्ह्याला पहिला सन्मान मिळवून देणारी नूतन मराठा महाविद्यालयाची पहिलीच विद्यार्थिनी ठरली. तिच्या या नेत्रदीपक कामगिरीमुळे संस्थेचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.पी.देशमुख व सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, १८ महाराष्ट्र बटालियानचे CO प्रविण धोमण, AO पवन कुमार, PI स्टाफ व एनसीसी विभाग प्रमुख CTO हेमाक्षी संजयराव वानखेडे, लेप्टनंट

शिवराज पाटील यांनी सोनाली पाटील हिचे कौतुक करुन रेल्वे स्टेशन ते नूतन मराठा महाविद्यालयापर्यंत सवाद्य मिरवणूक लेझीम पथकाने काढण्यात आली.



**दिल्ली येथील राजपथावर पी.एम.रॅलीत भारताचे पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी तसेच DG NCC Lt. गुरबीरपाल सिंग सर यांना गार्ड ऑनर देतांना १८ महाराष्ट्र बटालियन नेतृत्व करतांना SUO सोनाली विकास पाटील T.Y.B.Com. Nutan Maratha College Jalgaon NCC Unit (SW)**






**DG NCC Lt. गुरबीरपाल सिंग सर SUO सोनाली विकास पाटील NCC Unit (SW) हिस D.G.Commendation Card प्रदान करतांना २९ जानेवारी २०२२**



राष्ट्रीय कैडेट कोर
NATIONAL CADET CORPS

प्रमाण पत्र
CERTIFICATE

This is to certify that No. MH/19/SWA/352761 Rank SUO
Name Sonalee Vikas Patil Unit 18 Mah Bn NCC, Jalgaon
NCC Directorate Maharashtra

ने 18 दिसम्बर 2021 से 29 जनवरी 2022 तक, नई दिल्ली में, वार्षिक रा. कै. को. गणतन्त्र दिवस शिविर में, अपने रा. कै. को. निदेशालय का प्रतिनिधित्व किया ।

Represented his/her NCC Directorate, at the Annual NCC Republic Day Camp, held at New Delhi, from 18 December 2021 to 29 January 2022.

She was part of GUARD OF HONOUR During Prime Minister Rally

File No. : 17090/Cert/DGNCC/RDC-2022

Cert No.: DGNCC/RDC-2022/449

दिनांक : जनवरी 2022
Dated : 28 January 2022
स्थान : नई दिल्ली
Place : New Delhi

उदय सिंह मनकोटिया
Uday Singh Mankotia
कर्नल/Colonel
सचिव आर डी सी
Secretary RDC

गुरबिरपाल सिंह
Gurbirpal Singh
लेफ्टिनेंट जनरल
Lieutenant General
महानिदेशक राष्ट्रीय कैडेट कोर
Director General National Cadet Corps

**दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व केल्याबद्दल SUO सोनाली विकास पाटील हिस प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले दि.१८ डिसेंबर २०२१ ते २९ जानेवारी २०२२**



महानिदेशक राष्ट्रीय कैडेट कोर
द्वारा प्रशंसा

नं0 : एमएच19एसडब्ल्यूए352761 रैंक : एसयूओ
नाम : सोनाली विकास पाटिल
यूनिट : 18 महा बटालियन एनसीसी, जलगाँव
वर्ष : 2021

में सेवा करते हुए, अत्यंत सार्थक कर्त्तव्य-निष्ठा एवम् कार्य-कुशलता का परिचय देते हुए आपने जो सराहनीय योगदान दिया है तथा दूसरों के लिए जो अनुकरणीय उदाहरण प्रस्तुत किया है, उस पर समस्त राष्ट्रीय कैडेट कोर को और मुझे अत्यंत गर्व है।

नई दिल्ली
29 जनवरी 2022

गुरबीरपाल सिंह
लेफ्टिनेंट जनरल
महानिदेशक राष्ट्रीय कैडेट कोर

**महानिदेशक राष्ट्रीय कॅडेट कोर द्वारा SUO सोनाली विकास पाटील हिस प्रशंसा प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात आले दि.२९ जानेवारी २०२२**



**महाराष्ट्राचे राज्यपाल श्री.भगतसिंग कोश्यारी, महाराष्ट्र डिरक्टरेट मेजर जनरल वाय.पी. खंदूरी यांचेसह SUO सोनाली विकास पाटील NCC Unit (SW) दि.३० जानेवारी २०२२**



**महाराष्ट्र DIRECTORATE ADG Y.P. खंदुरी सर यांच्यासोबत सिनिअर अंडर ऑफिसर सोनाली विकास पाटील.**


Ajit Pawar @AjitPawarSpeaks · 1d

पंतप्रधान ध्वजचा (प्राईम मिनीस्टर बॅनर) वाहक छात्रसैनिक सिनिअर अंडर ऑफिसर सिद्धेश जाधव, उत्कृष्ट 'गार्ड ऑफ ऑनर'साठी सन्मानित सिनिअर अंडर ऑफिसर गितेश डिंगर, सिनियर अंडर ऑफिसर सोनाली पाटील यांचं अभिनंदन करतो.

3 13 129

**महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा SUO सोनाली पाटील व्हॉटसअपवरील कौतुकास्पद संदेश**




**महाराष्ट्र डायरेक्टरेट ADG श्री.वाय.पी.खंदूरी यांचे निवासस्थानी SUO सोनाली विकास पाटील सह स्नेहभोजन कार्यक्रमप्रसंगी**



**१८ महाराष्ट्र बटालियनचे CO कर्नल प्रविण धिमन व नुतन मराठा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.पी.देशमुख SUO सोनाली विकास पाटीलचे स्वागत करतांना**



**जळगाव महानगर पालिका चा महापौर जयश्री महाजन सिनिअर अंडर ऑफिसर सोनाली विकास पाटील यांचे स्वागत करताना**



संस्थेचे मानद सचिव व प्राचार्य SUO सोनाली पाटील हिचे स्वागत करतांना






SUO सोनाली विकास पाटील हिचे लेझीम पथकाद्वारे रेल्वे स्टेशन ते महाविद्यालयापर्यंत भव्य मिरवणूक




SUO सोनाली विकास पाटीलच्या सत्कार समारंभा प्रसंगी प्राचार्य डॉ.एल.पी. देशमुख सर, मनपा जळगावचे महापौर सौ.जयश्रीताई महाजन, मनपा आयुक्त श्री.सतीश कुलकर्णी, १८ महाराष्ट्र बटालियनचे AO पवन कुमार, लेफ्टनंट शिवराज पाटील, CTO हेमाक्षी वानखेडे व सोनाली हिचे आई-वडील